# पोलीस आयुक्तालय,अमरावती शहर
## दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०९/१२/२०२३

➢ **गैरकायदयाची मंडळी जमविणे :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | पोस्टे बडनेरा अप.क्र.८५९/२३ कलम ३२४, ३२३, १४३, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६ भा.दं.वि. | पो.स्टे. बडनेरा हद्दीत , अमरावती शहर | घटना ता.वेळ - दि.०८.१२.२०२३ चे २१.३० वा. माहिती ता.वेळ - दि.०९.१२.२०२३ चे ०५.०० वा. दाखल ता.वेळ - दि.०९.१२.२०२३ चे ०७.०२ वा. | एक महिला | १)पंकज गणोरकर वय- ५० वर्ष २) धुर्व गणोरकर रा. अकोली रोड अमरावती ३) प्रेम काकडे वय- २० वर्ष ४) दिपेश काकडे वय- ४५ वर्ष वरील ४ ही राहणार तिरुपती नगर नं.२ अमरावती ५) एक महिला | हकिकत अशा प्रकारे आहे की,यातील फि.चे मुलीचा आठ ते दहा दिवसापुर्वी आरोपी याने त्याच्या मोबाईल मध्ये फोटो काढला होता. तो फोटो मोबाईल मधुन डिलीट करण्याबाबत म्हटले होते. परंतु तो फोटो डिलीट केले नाही. म्हणुन फि.ची मुलगी ने मोबाईल रागात फोडुन टाकला. दि. ०८.१२.२०२३ चे २१.३० वा. दरम्यान फि.चे घरासमोर नमुद सर्व आरोपी हे महिंद्रा गाडी व एक हिरव्या रंगाची बुलेट बिना नंबरची ने आले व फि.ला व फि.चे परिवाराला शिवीगाळ करुन मारण्याची धमकी देवुन सर्व आरोपी हे फि.चे दुकान जवळ अमरावती येथे येवुन फि.ला फोन करुन बोलाविले वरुन फि.व फि.चा मुलगा व मुलगी हे तेथे गेले तर आरोपी क्र. १ याने तुमची मुलगी हिने माझ्या मुलाचा मोबाईल का फोडला असे म्हणुन फि.सोबत बाचाबाची करुन शिवीगाळ केली.तर फि.चा मुलगा याने आरोपी क्र.१ यास म्हटले तुम्ही शिवीगाळ का करता. तर आरोपी क्र.१ ते ४ यांनी फि.चे मुलाला लाथा बुक्कयांनी मारहाण केली. फि.चे मुलाचा मित्र हा भांडण सोडविण्याकरिता आला असता त्याला आरोपी क्र.५ हिने तिच्या हातातील चाकु मारुन जख्मी केले. व ते सर्व लोक तेथुन पळुन गेले. अशा जबानी रिपोर्ट वरुन व मेडी.सर्टी.वरुन सदरचा गुन्हा दाखल . |
| ०२ | पोस्टे बडनेरा अप.क्र.८६०/२३ कलम ३२६, १४३, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६, ४२७ भा.दं.वि. | पो.स्टे. बडनेरा हद्दीत , अमरावती शहर | घटना ता.वेळ - दि.०८.१२.२०२३ चे २१.३० वा. माहिती ता.वेळ - दि.०९.१२.२०२३ चे ०५.०० वा. दाखल ता.वेळ - दि.०९.१२.२०२३ चे ०७.३० वा. | पंकज रामचंद्र गणोरकर वय- ४९ वर्ष रा. संस्कार कलस अपार्टमेंट अकोली रोड रेल्वे क्रासींग जवळ अमरावती | १) चंद्रकांत व-हाडे रा. साहु ले आउट २) समीर शेख रा. अकोली ३) मोसीन रा. अमरावती व तिन महिला | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील मुलगी हिने फि.च्या मुलावर आठ ते दहा दिवसापुर्वी आरोप लावला की, तिचा मोबाईल मध्ये फोटो आहे. तर तिने मोबाईल फोडला. तर फि. समजुन सांगितले होते. नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी मुलगी हिने फिला फोन करुन बोलाविले तर फि.हे तेथे गेले असता तेथे नमुद सर्व आरोपी हजर होते. व आरोपी क्र.इ१ हिने म्हटले की, तुझ्या मुलाने माझ्या मुलीचे फोटो कशाला काढले होते. तुझा मुलगा कुठे आहे. असे बोलुन त्याला आम्ही सोडणार नाही. फि.ने म्हटले की, माझ्या मुलाकडुन मी माफी मांगतो. तर आरोपी क्र.१ व ३ याने फि.स लाथा बुक्कयांनी मारहाण केली. त्यांचे भांडण सोडविण्याकरिता फि.चे ओळखीचे इसम व त्यांची पत्नी हे आले असता त्यांना आरोपी क्र.३ याने पकडले आणि आरोपी क्र.६ याने चाकु ने मारहाण केली. त्यामुळे त्यांचे पोटात डाव्या बाजुने जबर मार लागला आहे. आरोपी क्र.१, २, ४ यांनी लाकडी काठीने मारहाण केली. आरोपी क्र.३ व ५ यांनी फि.ला लोखंडी रॉंड ने मारहाण केली. त्यामुळे फि.च्या डाव्या पायाच्या मागच्या मांडीवर व डाव्या हाताचे पंज्यावर मार लागला आहे. तेथे उभी असलेली महिन्द्रा XUV हिला लाकडी काठीने व गोटे मारुन तसेच हिरव्या रंगाची बुलेटला खाली पाडुन तिचे लाईट फोडुन व इतर ठिकाणी तोंडफोड करुन नुकसान केले. अशा जबानी रिपोर्ट वरुन व मेडी.सर्टी.वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ दुखापत :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | पो. स्टे कोतवाली अप क्र ५७६/२३ कलम ३२५,३२४,३२३,३४ भादवि | नमुना गल्ली नं ०५ अमरावती | गुन्हा घडला ता.वेळ दि.०९/१२/२३ चे ०९.३० गुन्हा दा. ता.वेळदि.०९/१२/२३ चे १३.०४ | महेश भगवान दास गुप्ता वय ५२ रा नमुना गल्ली नं ०५ अमरावती | १) शकील अहमद २) अकील अहमद ३) जमील अहमद सर्व रा नमुना गल्ली ०५अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की फि. यांचे नमुद ठिकाणी दुकान असुन दुकान चालवितात त्याचे नमुना येथे मिश्र वस्ती असल्याने त्याचे घराचे दोन तीन आड शकील अहमद यांचे घर आहे त्याचे कडे १० गायी असुन दि ०९/१२/२३ रोजी ०९.३० वा दरम्यिान फि. चे घरा समोर गाया उभ्या होत्या त्यानी शेण टाकले त्या हाकलण्यासाठी फि. गेले असता आरोपी शकील याने म्हटले की त्या माझ्या गायी आहे त्या का हाकलता फि ने म्हटले की गाया मोहल्यात घाण करतात अशा कारणा वरुन आरोपीने फि.च्या तोडावर थापडा भुक्यानी मारहाण केली त्यावेळी फि. चा मुलगा भांडण सोडविण्याकरीता गेले असता तीनही आरोपीने मारहाण केली फि. चे मुलास उजव्या डोळ्याला जबर मारहाण केल्याने काहीच दिसत नाही आहे तसेच त्याचे पायाला व हाताला मुक्का मार लागला आहे तसेत फि, ला सुध्दा डाव्या डोळ्या खाली व डावे हाताचे करंगळीला मुक्का मार लागला फि. चे मुलास उजव्या डोळ्याला जबर मारहाण केल्याने काहीच दिसत नसल्यामुळे फि. चे जबानी रि वरुन व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटनास्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | पो स्टे गाडगे नगर अप क्र १४३१/२३ कलम ३७९ भा द वि | पुंडलीक बाबा नगर अमरावती | गु.घटना ता व वेळ - ०७.१२.२०२३ चे ०४.३० वा दरम्यान | सुशिल रामदास लोखोडे वय ४२ वर्ष रा. श्रदधा कॉलनी अर्जुन नगर अमरावती | दोन अज्ञात इसम | हकीकत अशा प्रकोर आहे की यातील फिंयादी हे एम एस इ बी ऑफीस येथे गर्व्हमेंट कॉन्ट्रक्टर आहे. पुडली बाबा नगर येथे त्यांचे आई वडीलांचे घर आहे त्याठीकाणी त्यांनी लोखंडी इलेक्ट्रीक पोल ठेवले होते परंतु फि ने पाहले असता ते दिसले नाही यातील नमुद घ ता वेळी व ठीकाणी फिंयादी यांनी यातील नमुद ठीकाणी ठेवलेले इलेक्ट्रीकचे तीन लोखंडी खांब लांबी अंदाजे २५ ते २८ फुट काळया रंगाचे असे रिक्षा कटला मध्ये चोरुन नेतांना सि सि टी व्ही कॅमेरा मध्ये दिसुन येत आहे त्या तीन पोलची अंदाजे किंमत २०,००० रु आहे तसेच आज दि ०९.१२.२०२३ रोजी सकाळी ०४.३० वा दरम्यान फिंयादी चे वडील यांना बाहेर अंगणातुन आवाज येत असल्याने त्यांनी बाहेर जावुन पाहीले असता दोन अज्ञात इसम रिक्षा कटला घेवुन रोडवर ठेवलेले लोंखंडी सामान उचलुन नेतांना दिसुन आले वडीलांनी आवाज दिला असता ते पळुन गेले. त्यांनी आज सुदधा फिंयादीचे गोडावुन समोर ठेवलेले लोखंडी सामान चोरुन नेण्याचा प्रयत्न केला करिता त्याचे विरुदध पो स्टे ला येवुन रिर्पोट दिल्यानेक सदरचा गुन्हा दाखल |
| ०२ | पो. स्टे कोतवाली अप क्र ५७५/२३ कलम ३७९ भादवि | ईतवारा बाजार शालीग्राम नंदकिशोर यांचे किराणा दुकान अमरावती | गुन्हा घडला ता.वेळ दि.०८/१२/२३ चे १३.०० वा गुन्हा दा. ता.वेळ दि ०९/१२/२३ चे १२.४१ | एक महिला | अज्ञात | हर्कीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ. ता वेळी व ठिखाणी फि. हे ईतवारा बाजार येथे किराणा दुकानात किराणा सामान आणने करीता गेले व फिर्यादीचा मोबाईल हा दुकानात राहीला फि. तेथुन निघुन गेले फि. चे लक्षात येताच फि. हे नमुद घटनास्थळी गेले असता नमुद मोबाईल हा तेथे मिळुन आला नाही अशा फिर्यादीचे जबानी रि वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ **अपघात :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | पोस्टे फ्रेजरपुरा अप. न. १०४५/२०२३ क. २७९,३३७ भादवि. १३४ मो.वा.का. | य शोदा नगर चौक अमरावती | घटना ता वेळ - दि. ०८/१२/२०२३ चे १५/३० वा. दरम्यान दाखल ता वेळ - दि. ०९/१२/२०२३ चे ००-११ वा. | मोहम्मद ईकबाल अब्दुल कदीर वय ५५ वर्ष रा. नवी वस्ती बडनेरा अमरावती | ट्रक क्र. MH 27 BX 7058 चा चालक | हकीकत अश्या प्रकारे आहे की नमुद घता वेळ व ठिकाणी यातील फिर्यादी व फि ची मुलगी असे दोघे जन फि च्या टु व्हीलर होन्डा शाईन क्र एम एच ४९एन ९७८०ने यशोदा नगर रोड ने नांदगाव पेठ कडे जात असतांना सखा मंगल कार्यालय समोरून जात असतांना यशोदा नगर चौकातुन एक लहान ट्रक चालाने भरधाव वेगाने व निष्काळजी पणाने त्याचे वाहन चालवुन फिच्या गाडीला धडक दिली त्यामुळे फिला उजव्या हाताला व तळहाताला गंभीर मार लागला तसेच दोन्ही पायाला किरकोळ मार लागला फि मुलीच्या डाव्या पायाला मार लागला व डोक्याला सुध्दा मार लागला तोट्रक चालक आम्हाला मदत न करता पळुन गेला त्याचा ट्रक क्र .MH 27 BX 7058 हा आहे त्याच्या वर कार्यवाही व्हावी करिता बयान देत आहे अश्या फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन व मेडी सर्टीवरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ **ईतर :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | पो स्टे गाडगे नगर अप क्र १४२९/२३ कलम १२२ म पों का | नमक कारखाना आसीर कॉलनी अमरावती | गु.घटना ता व वेळ ०८.१२.२३ चे द२२.०० वा गु.दाखल ता. वेळ - ०९.१२.२०२३ चे ००.० वा | एच सी डी के देवकर ब न ११७९ पो स्टे गाडगे नगर अमरावती | ननविर बेग मिर्झा बेग वय १९ वर्ष रा हबीब नगर अमरावती | हकीकत अशा प्रकोर आहे की यातील फियादी हे पो स्टॉप सह मोटार सायकल ने पो स्टे परिसरात पेट्रोलींग करित असतांना यातील नमुद घ मा वेळी व ठीकाणी यातील आरोपी हा अंधारात आपले अस्तीत्व लपवुन चोरी करण्याचे/ गुन्हा करण्याचे उददेशाने मिळुन आला त्यास पंचासमक्ष ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव ननविर बेग मिर्झा बेग वय १९ वर्ष रा हबीब नगर अमरावती असे सांगितले त्यास त्याचे असे रात्री भटकण्याचे कारण विचारले असता त्यांनी समाधानकारक उत्तर न दिल्याने त्यास पो स्टे ला आणुन त्याचेवर कार्यवाही करुन सदरचा गुन्हा दाखल |
| ०२ | पो स्टे गाडगे नगर अप क्र १४३०/२३ कलम १२२ म पों का | रामपुरी कॅम्प गल्ल्ी न १ अमरावती | गु.घटना ता व वेळ ०९.१२.२३ चे ०२.४५ वा गु.दाखल ता. वेळ - ०९.१२.२०२३ चे ०६.२५ वा | एच सी डी के देवकर ब न ११७९ पो स्टे गाडगे नगर अमरावती | गौरव सुनिल अकोलकर वय २६ वर्ष रा विलास नगर अमरावती | हकीकत अशा प्रकोर आहे की यातील फियादी हे पो स्टॉप सह मोटार सायकल ने पो स्टे परिसरात पेट्रोलींग करित असतांना यातील नमुद घ मा वेळी व ठीकाणी यातील आरोपी हा अंधारात आपले अस्तीत्व लपवुन चोरी करण्याचे/ गुन्हा करण्याचे उददेशाने मिळुन आला त्यास पंचासमक्ष ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव गौरव सुनिल अकोलकर वय २६ वर्ष रा विलास नगर अमरावती असे सांगितले त्यास त्याचे असे रात्री भटकण्याचे कारण विचारले असता त्यांनी समाधानकारक उत्तर न दिल्याने त्यास पो स्टे ला आणुन त्याचेवर कार्यवाही करुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ प्रोव्हीशन रेड :- ०२

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ०१ | नांदगावपेठ | अप.क्र. ४८३/२३ कलम ६५(ई) म.दा.कायदा | पो.स्टे. नांदगांव पेठ हद्दीत अमरावती शहर | दि.०९/१२/२३ चे ०७/१५वा. | दि.०९/१२/२३ चे ०८/४४वा. | सरतर्फे ए.एस.आय. राजु काळे ब.नं. ८५७ पो.स्टे. नांदगाव पेठ | एक महिला | हकिकत अशा प्रकारे आहे कि नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी गुप्त बातमीदाराचे खात्रीलायक खबरे वरुन नमुद आरोपीवर प्रोरेड केली असता तिचे ताब्यातुन देशी दारु संत्रा चे १८० एम.एल.चे ८ नग किंमत अंदाजे ६४० /- रु चा माल मिळुन आला त्यातील एक सि.ए. सॅम्पल १८० एम.एल. ठेवण्यात आला अशा फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरच गुन्हा दाखल |
| ०२ | नांदगावपेठ | अप.क्र. ४८४/२३ कलम ६५(ई) म.दा.कायदा | पो.स्टे. नांदगांव पेठ हद्दीत अमरावती शहर | दि.०९/१२/२३ चे ०८/१०वा. | दि.०९/१२/२३ चे ०८/५३वा. | सरतर्फे ए.एस.आय. राजु काळे ब.नं. ८५७ पो.स्टे. नांदगाव पेठ | एक महिला | हकिकत अशा प्रकारे आहे कि नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी गुप्त बातमीदाराचे खात्रीलायक खबरे वरुन नमुद आरोपीवर प्रोरेड केली असता तिचे ताब्यातुन देशी दारु संत्रा चे १८० एम.एल.चे ७ नग किंमत अंदाजे ५६० /- रु चा माल मिळुन आला त्यातील एक सॅम्पल सि.ए. सॅम्पल १८० एम.एल. ठेवण्यात आले अशा फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरच गुन्हा दाखल |
| ०३ | नांदगावपेठ | अप.क्र. ४८५/२३ कलम ६५(ई) म.दा.कायदा | पो.स्टे. नांदगांव पेठ हद्दीत अमरावती शहर | दि.०९/१२/२३ चे ०८/४०वा. | दि.०९/१२/२३ चे ०९/०१वा. | सरतर्फे ए.एस.आय. राजु काळे ब.नं. ८५७ पो.स्टे. नांदगाव पेठ | एक महिला | हकिकत अशा प्रकारे आहे कि नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी गुप्त बातमीदाराचे खात्रीलायक खबरे वरुन नमुद आरोपीवर प्रोरेड केली असता तिचे ताब्यातुन देशी दारु संत्रा चे १८० एम.एल.चे ७ नग किंमत अंदाजे ४८० /- रु चा माल मिळुन आला त्यातील एक सॅम्पल सि.ए. सॅम्पल १८० एम.एल. ठेवण्यात आले अशा फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरच गुन्हा दाखल |